शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचे
कार्यालय, दिनांक - ११.५.९४

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग),
जिल्हा परिषद, पुणे-११.

MACHHINDRA V. NAGPURE
REGD. NO 7893

विषय - सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात नवीन खाजगी
प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत ....
शाळेत

संदर्भ - शासनाकडील शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. व्हीएलएस - १०९३/
(५१७०)प्राशि-३ दि. २८.१२.९३ व क्र. व्हीएलएस - १०९३(५९३५)प्राशि
दिनांक - २८.१.९४ चे पत्र.

उपरोक्त विषयासंबंधीचे आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेले शासनाकडील संदर्भाधीन पत्र कृपया अवलोकन करावे.

याबाबत कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेस ——— तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, १९९३ पासून इयत्ता पहिली ते सन १९९३-९४ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासाठी प्रत्येकी एका तुकडीस प्राथमिक शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदान तत्वावर खास बाब म्हणून परवानगी देण्यात येत आहे. तसेच इंग्रजी माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना कायम विनाअनुदान तत्वावर तसेच भविष्यात माध्यम बदलता येणार नाही या अटीवर परवानगी देण्यात येत आहे.

संस्थेचे नाव	शाळेचे नाव व ठिकाण	इयत्ता	माध्यम
पुणे विद्यार्थी गृह पुणे	शिशु निकेतन प्राथ. शाळा, सदाशिव पेठ, पुणे-३०	जून १९९३ मध्ये इ. १ ली ते प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गाच्या एका तुकडीस	इंग्रजी. मराठी.
महर्षी कर्वे स्त्री शि. सं. पुणे	कर्वेनगर प्राथ. शाळा, कर्वेनगर, पुणे-५२	—"—	इंग्रजी
डी.एस. सी. एज्यु. सोसा. पुणे	सेंट पीटर्स स्कूल, कसबा पेठ, पुणे-११.	—"—	उर्दू
[illegible] महाराष्ट्र एज्यु. सोसा. पुणे	उर्दू माध्यम प्राथ. शाळा रामटेकडी झोपडपट्टी, पुणे-१३	—"—	इंग्रजी.
——"—	इंग्रजी माध्यम	——"—	

.....(२)

२.१ सदर संस्था संस्था-नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

२.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचे आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेणीत व सेवा शर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

२.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, विधायक सुविधा इत्यादी शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

२.५ संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मुल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

२.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

२.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

२.८ संस्थेने परवानगी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा [illegible] यांच्यात कोणताही बदल करता येणार नाही.

२.९ संस्थेने शासनाकडून वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशांचे, कार्यपध्दतीचे नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

२.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरित परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

२.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

२.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम प्राधिकाऱ्याकडे (परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे) करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली

43

२.१२ परवानगी रद्द समजण्यात येईल. एकदा परवानगी नंतर नूतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

३.०० ~~संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळेसाठी रुपये~~ १,०००/- (रुपये एक हजार फक्त) अनामत ~~रक्कम शासनाकडे~~ जमा करणे आवश्यक आहे.

ही परवानगी देण्यापूर्वी संबंधित शाळेने नव्याने केलेल्या अर्जाची पुन्हा छाननी करून घेऊन मगच त्या संस्थेला त्या शाळेची मान्यता देणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१) संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२) संस्थेविरुद्ध गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

३) सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळेपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४) सदर संस्थेने चालविलेल्या प्राथमिक शाळेत व संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारच्या गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत, अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५) संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६) संस्थेने विहित नमुन्यात परिपूर्ण अर्ज केला आहे. (यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करून घ्यावा.)

७) शासनाची मंजुरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी या बाबतची पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरित या कार्यालयात पाठवावा.

सही/-
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. ~~[illegible]~~

प्रशासन अधिकारी/महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ पुणे-५
यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.

[illegible]

प्रत :- मा. सचिव ..... सर्व संबंधित ..... यांना माहितीसाठी अग्रेषित.

~~सही-प्रत~~

[illegible]

TRUE COPY
MACHHINDRA V. NAGPURE
NOTARY GOVT OF INDIA

MACHHINDRA V. NAGPURE
REGD NO 7693